बीड । गुरुवार
०३.०७.२०२५
वर्षे : ५ अंक : ९३
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# राजकीय वादात नगरपालिका भ्रष्टाचाराचा मुद्दा बाजूला

## आमदार संदीप क्षीरसागर नगरपालिकेच्या लाडक्या किरण देशमुख वर विधानभवनात प्रश्न उपस्थित करणार का ?

● बीड नगरपालिका नप फंडाचा २०२४ -२५ चा आर्थिक ऑडिट करण्याची मागणी !

● किरण देशमुख, योगेश हाडे, मंगेश भंडारे, मुख्याधिकाऱ्यांनी मिळून नगरपालिकाची वाट लावली !

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात भ्रष्टाचाराचे लागलेली कीड कोणत्याच वाशिंग मशीन मध्ये टाकल्यानंतरही धुतली जाणार नसल्याचे दिसत आहे. येथील अधिकारी कोणालाच घाबरत नसल्याने या अधिकाऱ्या विरोधात कितीही बोंबाबोंब मारा यांना कोणताच फरक पडत नाही. बीड जिल्ह्यात सध्या विविध राजकीय वाद प्रतिवाद सुरू असल्याने बीड शहरातील नगरपालिकेच्या नप फंडातून विविध विकास कामांच्या नावाखाली बोगस बिले काढण्यात आली. याची साधी चौकशीही होत नसल्याने बीडच्या आमदारांना नेमकं झालंय काय असा प्रश्न उपस्थित होत असून विधान भवनात बीड नगरपालिकेचा मुद्दा उचलणारे आमदार संदीप क्षीरसागर बीड नगरपालिकेला लागलेल्या या अधिकारी



कर्मचाऱ्यांची कीड बाजूला करतील का ?

बीड नगरपालिकेचा भ्रष्टाचार मुळापासून उकडून टाकण्याची हिंमत माजी आमदार



स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्यातच होती. नगरपालिकेच्या विविध विकास कामे व फंडाची थेट विधानपरिषद मध्ये तारांकित प्रश्न उपस्थित करत अनेकांचे भ्रष्टाचार उघडे करणारे स्वर्गीय विनायक मेटे आज हयात नसल्याने बीड नगरपालिकेच्या विरोधात ठाम भूमिका घेणारे लोकप्रतिनिधी जिल्ह्यातच दिसत नसल्याचे चित्र आहे. आमदार संदीप क्षीरसागर यांनी यापूर्वी बीड नगरपालिकेच्या भ्रष्ट कारभाराचे वाभळे काढले मात्र यानंतर आमदार साहेब पुन्हा शांत झाले. कारण गुलदस्त्यात, बीड नगरपालिकेचा प्रशासकीय कारभार ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● बीड नगरपालिकेचे आर्थिक ऑडिट करावे

सन २०२४ पंचवीस या आर्थिक वर्षातील नगरपालिकेच्या विशेष नगरपालिका फंडातील मजूर संस्थांना व गुत्तेदारांना काढलेली सर्व बिलांची आर्थिक तपासणी करण्यात यावी. नगरपंचायत मंत्रालयाद्वारे तसेच त्रिस्थ पार्टी कडून या विशेष ऑडिटची मागणी आमदार संदीप सरकार यांनी करावी. बीड नगरपालिकेत झालेला भ्रष्टाचार बीड शहर वासियांच्या विकास कामांना रोखणार आहे. बीड नगरपालिकेत साम ान्य नागरिक कर भरत घामाचा पैसा लावतो मात्र या ठिकाणी अधिकारी आपल्या पदाचा गैरवापर करत मर्जीतील गुत्तेदारांना बोगस बिले देतात. मागील सहा महिन्याचे नगरपालिकेचे आर्थिक ऑडिट केल्यास सर्व गोष्टी बाहेर येतील.

### ● आमदार संदीप क्षीरसागर शांत झाले का

नगरपालिका विरोधात आक्रमक भूमिका घेणारे बीडचे आमदार संदीप क्षीरसागर नगरपालिका प्रश्नावर शांत झाले आहेत का. यापूर्वी अनेक वेळा येथील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या विरोधात संदीप क्षीरसागर यांनी कठोर भूमिका घेतलेली आहे. मात्र बीड नगरपालिकेत किरण देशमुख सारखे अधिकारी बोगस बिले काढण्याचा सपाटा लावतात याकडे मात्र आमदार संदीप क्षीरसागर जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत का. नगरपालिका निवडणूक पूर्व अधिकारी व त्यांनी केलेल्या कामांची चौकशी तसेच आर्थिक ऑडिट झाल्यास बीड नगरपालिकेत मध्ये झालेल्या कोट्यवधी रुपयांचा घोटाळा बाहेर येईल. मात्र आक्रमक असलेले आमदार संदीप क्षीरसागर बीड नगरपालिकेच्या विरोधात मावळ भूमिका घेताना दिसत आहेत.

## जालना अनुदान घोटाळा: सदोष ई पंचनामा पोर्टल व अप्रूव्हल (मंजुरीचे) अधिकार तहसीलदार यांना नसणे हाच मोठा दोष

**बीड । प्रतिनिधी**

अंबडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके (सध्या बीडला तहसीलदार ) जून २३ ते ऑगस्ट २४ या कालावधीत कार्यरत होते . १४ म हिन्यापैकी बारा महिने त्यांचे जरांगे पाटील यांच्या उपोषणकामी गेले .

जालन्यात व राज्यात सर्वत्र करोडो रुपये बोगस लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा झाले . यात तलाठी , ग्रामसेवक , कृषी सहाय्यक यांनी दुबार, तिबार खात्यावर रकमा जमा केल्याचे आपण ऐकत आहोत . या निमित्ताने सदोष यंत्रणा, सदोष कार्यपद्धती यावर चर्चा होणे अपेक्षित आहे . शासनाच्या लाभाच्या अनेक योजना आहेत. हा लाभ वितरीत करताना वेगवेगळ्या विभागामार्फत अनेक पोर्टल विकसित केली जातात . उदाहरणार्थ संजय गांधी, श्रावणबाळ विभागासाठी डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर प्रक्रिया सुरू आहे . याच प्रकारे कृषी विभाग, पंचायत समितीमार्फत ही सरळ लाभार्थ्यांच्या खात्यात रकमा जवळ जमा केल्या जातात . मदत व पुनर्वसन विभागामार्फत वरील अनुदान वितरणासाठी ई पंचनामा पोर्टल विकसित करण्यात आले आहे . यासाठी एमएच डॉट डिझास्टर मॅनेजमेंट डॉट महा आयटी डॉट ओआरजी ही वेबसाईट वापरण्यात येत आहे . संपूर्ण राज्यभरात या वेबसाईटचे अथवा पोर्टलचे अनेक दोष समोर आले आहेत . या पोर्टल वर लाभार्थ्यांचा डेटाबेस अपलोड करण्यात

▶▶ उर्वरित पान २ वर

## परळी वैद्यनाथ येथे कृषी भवन उभारण्याच्या 1 कोटी 67 लाख रुपयांच्या निधी खर्चास प्रशासकीय मान्यता

### ● धनंजय मुंडे यांची आणखी एक शब्दपूर्ती

**मुंबई । प्रतिनिधी**

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी मागणी केल्याप्रमाणे सहकार व पणन विभागाने म राठवाड्यात नामांकित असलेल्या परळी वैद्यनाथ कृषी उत्पन्न बाजार



समितीच्या आवारात कृषी भवन उभारण्याच्या कामासाठी १ कोटी, ६७ लाख ७० हजार रुपयांच्या निधी खर्चास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेतून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. धनंजय मुंडे यांनी यानिमित्ताने परळी मतदारसंघात दिलेल्या आणखी एका शब्दपूर्तीस दुजोरा प्राप्त झाला आहे. परळी वैद्यनाथ कृषी उत्पन्न बाजार समि ती ही मराठवाड्यात वैभव संपन्न बाजार समिती म्हणून ओळखली जाते. शिवाय ज्योतिर्लिंग स्थळ असल्याने येथील कृषी उत्पन्न बाजारपेठ मोठी आहे. त्यामुळे येथे विविध कामांसाठी येणाऱ्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## चकलांब्यात वाळू तस्करांना पुन्हा दणका

### २७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**चकलांबा । प्रतिनिधी**

पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत यांनी अवैध धंद्यांवर कठोर कारवाईच्या दिलेल्या आदेशानुसार चकलांब्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी पुन्हा वाळू तस्करांवर कारवाई केली आहे.गोदापात्रात केलेल्या या कारवाईत २७ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी चकलांबा-पोलीस ठाण्यात १) विकास संपत केसभात रा. गायकवाड जळगाव २) मोहम्मद अहमद शेख रा. सुकली रा. शेवगांव जिल्हा



अहिल्यानगर अश्या ०२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चकलांबा पोलीस स्टेशन हद्दीत सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी मागच्या काही दिवसांत वाळू तस्करांवर मोठ्या कारवाया केल्या आहेत.बुधवारी (दि.२) महारटाकळी येथे नदी पात्रात एक ट्रॅक्टर चोरटी वाळू वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार पाटील यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना करत कारवायाचे आदेश दिले. त्यानुसार पोलिसांनी छापा मारला असता यावेळी वाळू तस्करी करणारे टॅक्टर व एक जेसीबी आढळून आले.त्यानुसार दोन्ही वाहने ठाण्यात आणण्यात आली असून या कारवाईत २७ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत,अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,पोलीस उपअधीक्षक श्री.राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, पोह/१५३३ अमोल अंकुश येळे, पोशी / २००४ कैलास विठ्ठल खटाने, पोशी/२३१ प्रशांत कल्याण घोंगडे, आदींनी केली आहे.



*राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दैनिक मराठावाडा पत्राचे संपादक दत्तात्रय नरनाळे, मा. पंचायत समिती सदस्य राजाभाऊ गवळी छायाचित्रात दिसत आहेत.*






*बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक पासून ते नगर नाकापर्यंत डिव्हाडर टाकण्यात आले असून, या दरम्यान एकही यू टर्न सोडण्यात आले नाही. यामुळे जिल्हाधिकारी, तहसील, समाजकल्याण कार्यालयात जाण्यासाठी वाहन धारक रॉंक साईडने जात असल्याने या वाहन चालकांना आणि हेल्मेट न वापरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करताना वाहतूक शाखेचे सहा.पो.नि. सुभाष सानप, पो. उपनि. विजय जाधवर व कर्मचारी.*

## बीड जिल्हा वकील संघ च्या वतीने मोफत आयुर्वेदिक तपासणी शिबिर



**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २ जुलै रोजी जिल्हा व सत्र न्यायालयात या दोन दिवसीय शिबिराचे उद्घाटन प्रमुख जिल्हा न्यायाधीश यावलकर सर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले या शिबिरामध्ये मधुमेह, रक्तदाब, योगा याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे सदरील शिबिर हे दोन दिवस सकाळी साडेदहा ते साडेचार पर्यंत जिल्हा वकील संघ च्या कार्यालयात सुरू राहणार आहे असे बीड जिल्हा वकील

संघाचे कडून कडव्यात आले वेळी वकील संघाचे अध्यक्ष रोहिदास येवले, सचिव यासेर पटेल व इतर न्यायीक अधिकारी वकील बंधू भगिनी व कर्मचारी वर्ग व पक्षकार उपस्थित होते, हे शिबिर २ दिवसाची आहे तरी सर्वांनी या शिबिराचा लाभ घ्यावा अशे आव्हान बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## आरोपी कृष्णा आंधळे अद्यापही फरार, धनंजय देशमुख आक्रमक, म्हणाले 'लवकरच कठोर निर्णय घेणार'

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या घटनेनंतर वाल्मिक कराडसह इतर आरोपी मकोका अंतर्गत अटकेत आहेत. या प्रकरणाला ६ महिने पूर्ण झाले असून अद्यापही कृष्णा आंधळे हा आरोपी फरार आहे.

याप्रकरणी आता सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी कृष्णा आंधळेपासून आमच्या जीवितास धोका आहे. त्याला अटक न केल्यास मी लवकरच कठोर निर्णय घेणार असल्याचे सांगितले आहे.

धनंजय देशमुख काय म्हणाले? 'फरार आरोपी कृष्णा आंधळेला अटक करा ही आमची वारंवार मागणी आहे.



जेल प्रशासनातील मागील काही दिवसांपासून दिली जाणारी व्हीआयपी ट्रीटमेंट बघता आरोपींना वेगवेगळ्या कारागृहात पाठवावं ही आमची मागणी होती. पण तसं काहीही झालं नाही. त्यावेळेस असं सगळं असताना बीड कोर्टात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे चिन्ह असलेल्या गाड्या, पदाधिकारी, आरोपींचे समर्थन करणारे लोक मोठ्या प्रमाणात येत देशमुख कुटुंबावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत,' असे धनंजय देशमुख म्हणाले.

इतर प्रकरणातील आरोपी जेर बंद होतात, पण देशमुख कुटुंबातील कृष्णा आंधळे अद्यापही फरार आहे. त्याच्यापासून आमच्या जीविताला धोका आहे. त्यामुळे

▶▶ उर्वरित पान २ वर

## पान १ वरून पुढे...

### राजकीय वादात...

हातात घेतल्यापासून मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी मन मर्जीप्रमाणे नगरपालिकेचा कारभार हाकला आहे. यातच बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांच्या नावाची चर्चा बीड शहरात मोठ्या प्रमाणात होत असून नगरपालिकेचे अनेक नप फंडाचे बिल काढताना बोगस बिले काढल्या असल्याची चर्चा आहे. किरण देशमुख यांना सहकार्य करत बोगस बिलांचा काढण्याचा सपाटा लावणारे योगेश हाडे व मंगेश भंडारे यांच्याही कारभाराविषयी संशय निर्माण होत आहे. विशेष म्हणजे या सर्वांवर देखरेख करण्याची जबाबदारी असणाऱ्या प्रशासकीय अधिकारी त्याचा मुख्य अधिकारी नीता अंधारे यांना नगरपालिका फंडातील काढलेल्या बिलाची माहिती नाही का ? २०२४ २५ या आर्थिक वर्षाचा नगरपालिकेचा महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाच्या ऑडिट विभागाकडून आर्थिक ऑडिट केल्यास यामध्ये अनेक गोष्टी बाहेर येतील. नगरपालिकेत नगरपालिका फंड वितरित संदर्भात अनेक वेळा माहिती मागितली असता यांच्याकडून कोणतीही माहिती देण्यास टाळाटाळ केली जात आहे. यावर्षी नगरपालिकेने कोणत्या मजूर संस्थांना कामे दिली व किती बिले या मजूर संस्थेच्या नावाखालील काढण्यात आली याची सर्व माहिती मागितली असता देण्यास असमर्थ दाखवण्यात येते. या मागचे कारण अद्यापही स्पष्ट नाही. मागील आठ दिवसापूर्वी नगरपालिकेने तीन कोटीची बिले नगरपालिका फंडाची काढली यातील अर्धी बिले ही बोगस असल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात होत असून जानेवारी ते मार्च यादरम्यान तब्बल २५ कोटी रुपयांची बिले काढण्यात आली. या सर्वांचे विशेष ऑडिट होणे गरजेचे आहे. बांधकाम विभागातून मंजूर करण्यात आलेली बिले कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांच्या चतुर काढण्यात आलेली आहे. खाजगी कार्यालयात नगरपालिकेचे कामे करणारे किरण देशमुख यांच्यासह योगेश हाडे, मंगेश भंडारे यांचेही चौकशी होणे गरजेचे झाले आहे. आमदार संदीप क्षीरसागर यांनी बीड शहरातील नगरपालिकेच्या माध्यमातून झालेला भ्रष्टाचार उघडा करावा. मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री यांच्याकडे बीड नगरपालिकेचे विशेष ऑडिट करण्याची मागणी करावी. बीड नगरपालिकेचा मुद्दा विशेष तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित करावा. मात्र बीड जिल्ह्याचे राजकारण हे वेगळ्या दिशेने सुरू आहे यामुळे लोकांना फक्त राजकीय हेवेदावे आरोप प्रत्यारोप यांच्यातच जास्त रस असल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांचे चांगभले होत आहे.

### जालना अनुदान...

आला , त्यानंतर हा डेटाबेस बरोबर आहे किंवा नाही हे तपासणे पोर्टलचे काम आहे . परंतु या पोर्टलच्या बाबतीत असे घडले नाही . संबंधित पोर्टल हे कोणत्याही खातेदार विषयक डाटाबेस यावर आधारित नाही . हे पोर्टल केवळ अपलोड केलेल्या लाभार्थ्यांच्या नावासमोरील आधार क्रमांकावर अनुदान टाकते . हे पोर्टल संबंधित लाभार्थी व आधार याची पडताळणी करत नाही , असे निदर्शनास आले आहे . आपण अनेकदा आधार वरील नाव व बँकेचे नाव चुकीचे असेल तर खात्यावर पैसे जमा होत नाही असे ऐकतो , पाहतो . परंतु या पोर्टलच्या बाबतीत खातेदार वेगळा , सातबारा वेगळा, आधार क्रमांकवाला वेगळा आणि बँक खातेधारक वेगळा , असे जर असेल तर त्या व्यक्तीचे नाव स्वीकारलेच गेले नको होते . हे पोर्टल कार्यान्वित करताना अचूक व जलद गतीने लाभार्थ्यापर्यंत अनुदान पोहोचवण्याचे आश्वासन मदत व पुनर्वसन विभागामार्फत देण्यात आले होते . त्यातील चुका लक्षात येताच पोर्टल तात्काळ बंद करणे अपेक्षित होते . पूर्वी कृषी सहाय्यक , ग्रामसेवक, तलाठी यांच्याकडून याद्या आल्यानंतर तहसील कार्यालयात तहसीलदार व कार्यालयीन अधिकारी, कर्मचारी या याद्या पडताळून पाहत असत . त्यानंतर हस्तलिखित चेकद्वारे रकमा बँकेस पाठविल्या जात होत्या . आता मात्र यूजर आयडी तहसीलदार यांचा आणि मंजुरी चे अधिकार जिल्हा स्तरावार . मग तहसीलदार इतर कामात असताना कस १०० % तपासतील . जर नवीन पोर्टल आणावयाचे होते , तर त्या पोर्टलच्या चुका लक्षात घेऊन , दुरुस्त करून त्यानंतरच ते कार्यान्वित केले पाहिजे होते . आजही अनेक लाभार्थ्यांपर्यंत अनुदान पोहोचले नाहीत . त्यामुळे तहसीलदार व कर्मचाऱ्यांचा कार्यालयीन वेळेचा निम्मा वेळ हा खातेदारांच्या प्रश्नांना उत्तर देण्यात जातो . खातेदारांनाही ईकेवायसी केल्यानंतर किती दिवसात पैसे पडतील याविषयी खात्री लायक माहिती देता येत नाही . एकंदरीतच काय तर तांत्रिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या सदोष अशा पोर्टलचाही या अनुदान घोटाळ्यात सिंहाचा वाटा असल्याचे दिसून येते . शिवाय ज्यांच्या खात्यावर या रकमा जमा झाल्याने त्यांच्याकडून वसूल करणे आवश्यक आहे . त्यांची नावे जाहीर करणे अपेक्षित आहे . रकमा वसुल होणे अपेक्षित आहे . अजुन मराठवाड्यात सर्व जिल्ह्यात चौकशी , तपसणी सुरु आहे , त्याला २ /३ महिने लागतील . राज्यभरातील अशा प्रकारे झालेल्या चुका दुरुस्त होणे अपेक्षित आहे .

### परळी वैद्यनाथ...

शेतकऱ्यांना निवारा व सर्व सोयी एकत्र उपलब्ध होण्याच्या दृष्टीने येथे शेतकरी भवन उभारण्याच्या कामासाठी निधी मंजूर करण्याची मागणी धनंजय मुंडे यांनी केली होती. त्यानुसार सहकार विभागाने आज प्रशासकीय मान्यता दिली आहे. याबाबत बाजार समितीचे सभापती सूर्यभान मुंडे, उपसभापती श्री जाधव, सचिव बलवीर रामदासी यांनीही आ. धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला. तसेच त्यांनी श्री मुंडे यांच्या सह सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत.

### आरोपी कृष्णा...

लवकरात लवकर कृष्णा आंधळेला अटक करण्यासाठी मी कठोर निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनाची असेल. या मागणीची गंभीर दखल घ्यावी, असे धनंजय देशमुख म्हणाले.

## पान ४ वरून पुढे...

### दिव्यांग, ज्येष्ठांना...

नोंदणी प्रक्रिया आणि आवश्यकतेनुसार तात्काळ मोफत कृत्रिम अवयवांचे वाटप केले जाईल. हा उपक्रम दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी एक मोठा दिलासा ठरणार आहे. या माध्यमातून त्यांना आत्मनिर्भर होण्यास आणि दैनंदिन जीवन सुलभ करण्यास मदत मिळेल.

#### बीडीओ असतील नोडल अधिकारी-

पुर्व तपासणी शिबीरासाठी संबंधीत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना दिव्यांग नोडल अधिकारी म्हणुन काम करावयाचे आहे. सदर पूर्व तपासणी शिबीरासाठी बीड जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील कर्मचारी यांना दिव्यांग दूत म्हणुन नियुक्त करण्यात आले आहे. मुख्याध्यापक यांच्या नियंत्रणाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे दिव्यांग दूत म्हणून काम करतील.

#### तालुकानिहाय दिव्यांग दूत शाळा-

केज: मतिमंद निवासी विद्यालय, उमरी मुकबधीर निवासी विद्यालय, उमरी अस्थिव्यंग निवासी विद्यालय, केज. अंबाजोगाई: ज्ञानवर्धिनी मूकबधीर निवासी विद्यालय, अंबाजोगाई योधवधिनी मतिमंद निवासी विद्यालय, अंबाजोगाई अहिल्यादेवी मुकबधीर निवासी विद्यालय, अंबाजोगाई ज्ञानसागर कर्णबधीर निवासी विद्यालय, जवळगाव सेवा मतिमंद कार्यशाळा, धानोरा. बीड: आर्युमर्गलम निवासी मुकबधीर विद्यालय, बीड प्रज्ञाचक्षु निवासी अंध विद्यालय, बीड रुख्माई गोविंद मतिमंद निवासी विद्यालय, पांगरी रोड बीड मतिमंद निवासी विद्यालय, वासनवाडी अनिवासी मुकबधीर विद्यालय, वासनवाडी. माजलगांव: मतिमंद निवासी विद्यालय, माजलगांव मुकबधीर निवासी विद्यालय, माजलगांव मतिमंद निवासी विद्यालय, किट्टीआडगाव मुकबधीर नियासी विद्यालय, किट्टीआडगाव. पाटोदा: मुकबधीर निवासी विद्यालय, तांबाराजुरी मतिमंद निवासी विद्यालय, तांबाराजूरी, मतिमंद निवासी विद्यालय, दासखेड. वडवणी: साईनाथ मतिमंद निवासी विद्यालय, नाथापुर मतिमंद निवासी विद्यालय, संभाजी नगर बीड अस्थिव्यंग निवासी विद्यालय, नेकनुर मुकबधीर निवासी विद्यालय, नेकनूर. आष्टी: छत्रपती शाहू महाराज मुकबधीर निवासी विद्यालय, आष्टी छत्रपती शाहू महाराज अस्थिव्यंग निवासी विद्यालय, आष्टी श्रेया मतिमंद निवासी विद्यालय, कारखेल, धारूर: मतिमंद निवासी विद्यालय धारुर अस्थिव्यंग निवासी विद्यालय, धारुर मुकबधीर निवासी विद्यालय, धारुर मतिमंद निवासी विद्यालय, बीड रोड धारुर. परळी: मानवविकास मुकबधीर निवासी विद्यालय, अंबाजोगाई मानवविकास मतिमंद निवासी विद्यालय, अंबाजोगाई मानवविकास अस्थिव्यंग निवासी विद्यालय, अंबाजोगाई मुकबधीर निवासी विद्यालय, परळी कर्तव्य मतिमंद निवासी विद्यालय, अंबाजोगाई मतिमंद निवासी विद्यालय, शिरुर: मतिमंद निवासी विद्यालय शिरूर, अस्थिव्यंग निवासी विद्यालय तळेगाव, ता.बीड. गेवराई: अस्थिव्यंग निवासी विद्यालय, तळेगाव ता. जि.बीड के.केशवरावजी धांडे मतिमंद निवासी विद्यालय, तलवाडा ता.गेवराई मतिमंद निवासी विद्यालय, गेवराई प्रौढ मतिमंद निवासी कार्यशाळा, तलवाडा.

### 'तलवाडा ग्रामपंचायत...

ना अनेक प्रश्न जनतेमधील चर्चेचा विषय बनला असून रेकॉर्ड ची तपासणी केली तर असे अनेक प्रकरणे बाहेर येतील अशीही चर्चा आहे. गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत चा कारभार हा मागील चार वर्षांपासून अनागोंदी आणि अनियमित पने सुरू आहे. याबाबत मागील काळात अनेक तक्रारी ही झाल्या आहेत. आणि अनेक तक्रारी पेंडिंग देखील आहेत काही प्रकरणे वरिष्ठ पातळीवर आहेत याकडे अधिकारी यांनी वेळीच लक्ष देऊन कार्यवाही करणे गरजेचे होते. जेणे करून ग्राम पंचायतच्या आनागोदी कारभाराला आळा बसला असता परंतु दुर्लक्ष केल्यामुळे या कारभारात वाढ होत गेली आणि अनेक प्रकरणे बोगस करण्यात आली . मोठी आर्थिक देवाण घेवाण करत चक्क सरकारी जागेवर भोगवट्यात नाव लावण्याचे नियम असताना मालकीत नाव लावण्याचा प्रताप केला आहे. यासारखे अनेक प्रकरणे झाले असून कामे न कारताच अनेक बिले उचलण्यात आलेली आहेत. याला जबाबदार असणारे अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर वरिष्ठ अधिकारी कार्यवाही करतील का ? असा प्रश्न सध्या उपस्थित होत असून आणेक दिवसाचा भिजत घोंगडे आसलेला गाव तलाव संरक्षण भिंती लगट आतिक्रमणाचा मुद्दा पुन्हा आता नव्याने समोर आल्याने तलवाडा ग्रामपंचायतचा अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आला असल्याने पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यावर काय चौकशी करून कार्यवाही करतात हे पहावे लागेल.

### जिजाऊ मल्टीस्टेट...

रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा संघर्ष कृती समितीचे मार्गदर्शक अशोकराव हिंगे यांनी दिला आहे. एसपी साहेबांनी तत्परता दाखवून संचालकांच्या मालमत्ता जप्ती बाबत सुचना दिल्या. दोन-तीन गरीब संचालक वगळता बाकी जण मुख्य आरोपींचे नातलग व परिवारातील आहेत. काही संचालकांच्या मालमत्तांची माहीती दिली. परंतु जप्तीची कारवाई होत नाही.आर्थिक संकटात होरपळणाऱ्या ठेवीदारांना कायद्याप्रमाणे पूर्ण सहकार्य करण्याची जबाबदारी आर्थिक गुन्हे शाखेची आहे. ठेवीदारां पेक्षा संचालकांची काळजी होतेय.ठेवीदारांनी आवश्यक कागदपत्रांची मागणी केली तर अजब उत्तरे दिली जात आहेत.पोलीस तपासा प्रमाणे १५७ कोटीचा घोटाळा असुन. एमपीआयडी प्रस्तावात समाविष्ट मालमत्तेच्या लिलावातून रक्कमेची भरपाई होऊ शकणार नाही. शिवाय काही मालमत्ता धारक हायकोर्टात हे गेले आहेत. यातुन एखादी मालमत्ता वगळली गेली, आणि संचालकांच्या मालमत्ता नसतील तर तर पुन्हा अपेक्षित रक्कमेत तुट वाढणारच. शिवाय मुख्य आरोपी व संचालकांची मालमत्ता बीड जिल्ह्या बाहेर नाशिक, पुणे, ठाणे, छ. संभाजी नगर आदी जिल्ह्यांतील मालमत्तातपासल्या नाहीत.मालमत्ता शोधण्यासाठी सरकारची यंत्रणा असताना पाठपुरावा केला जात नाही. व ठेवीदरांना पाठपुराव्या साठी मदत केली जात नाही. या हलगर्जीपणा मुळे ठेवीदारांचे नुकसान होणार.याला जबाबदार कोण. जिजाऊ मल्टीस्टेट घोटाळ्यातील आरोपींना पोलीसांनी जरब बसवली असती तर मल्टीस्टेट कडुन सुरू असलेल्या लुटमारीचे धाडस झाले नसते. पोलीसांनी एपपीआयडी कायद्याच्या तरतुदी नुसार आरोपी, संचालक मंडळ व तत्संबंधी सर्व व्यक्तींच्या मालमत्तांचा तपास व जप्तीची प्रमाणिक कारवाई करुन दिलासा दिला पाहिजे अशी मागणी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष शेख कुतुब भाई, मारुती तिपाले, लक्ष्मण हाटवटे, डॉ अरविंद काकडे, सुर्यभान नवले, इंजि. कळासे यांच्यासह ठेवीदारांनी केली आहे.

### निराधार व वृद्ध ...

सातबारा मोहिमा राबविणे यासाठी मार्गदर्शन करत आहेत . शिवाय जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या कमी कशा होतील यासाठी अनेक वेळा बैठकांमध्ये मार्गदर्शन केले आहे . शेतकऱ्यांना , गावकऱ्यांना अपीलही केलं आहे . बीड जिल्ह्यातील बालविवाहाचे प्रमाण सुद्धा लक्षणीय आहे . यात घट व्हावी म्हणून जिल्हाधिकारी यांनी स्वतः साक्षाळपिंपरी येथे गावकऱ्यांना शपथ दिली होती. एकंदरीत प्रशासनाच्या या सकारात्मक भूमिकेमुळे तालुकास्तरावरील अधिकारी यांचेही मनोबल वाढलेले दिसून येते . सर्वसामान्य व्यक्ती , नागरिक यांना कमीत कमी त्रास व्हावा , त्यांची कामे प्रधान्याने व्हावीत , लवकरात लवकर व्हावी यासाठी बीड तहसील कार्यालयातील तहसीलदार चंद्रकांत शेळके , नायब तहसीलदार सुहास हजारे , नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , नायब तहसीलदार सुरेंद्र डोके , नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे , नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर व त्यांच्या अधिनस्त कर्मचारी राबतांना दिसत आहे . सध्या बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी अनेक शेतरस्ते , पांदण रस्ते , शिवरस्ते यांचे वाद मिटवून रस्ते मोकळे केले . अश्याच रस्त्यासंदर्भात चाकरवाडी येथील शेतकऱ्यांनी तहसीलदार शेळके यांच्याकडे शेत रस्त्यावरील अतिक्रमण मोकळे करून देण्याची मागणी करण्यासाठी फोन केला असता लगेच व्हिडिओ कॉल करून सर्व शेतकऱ्यांशी बोलून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले तसेच पुढील कार्यवाही करण्यासाठी संबंधितांना आदेश दिले.

चाकरवाडी येथील संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ अनुदान योजनेमधील काही लाभार्थी दिव्यांग आणि वृद्ध असल्यामुळे डीबीटी करू शकले नाहीत . त्यांची ही अडचण तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना सांगितली असता त्यांची पण अडचण व्हिडिओ कॉल वरूनच दूर केली . लगेच संगायो निराधार विभागामध्ये आदेश देऊन सर्व निराधारांच्या अडचणी सोडवण्याचा आदेश दिले . ई आधार घेऊन येण्यास सांगितले . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या नेहमी मंडळ अधिकारी आणि तलाठी यांच्या बैठका घेऊन सविस्तर सूचना देत असतात . मंडळ अधिकारी , तलाठी आणि क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या समस्या गावात , शेतात जाऊन ऐकून घ्याव्यात . शक्यतो तेथेच निराकरण करण्यात यावे अशा प्रकारच्या त्यांचा हट्ट असतो .बीडला येऊन नागरिकांचा वेळ वाया जाऊ नये तसेच त्यांना त्रास होऊ नये म्हणून तहसीलदार शेळके यांनी व्हिडिओ कॉलचा पर्याय निवडून नागरिकांना होणारा त्रास कमी केला. शेतकरी तसेच निराधार ,अपंग ,वृद्ध यांनी तहसील कार्यालयाकडे येऊन पाठपुरावा करण्यापेक्षा व्हिडिओ कॉल वरून गावातच अडीअडचणी सोडवल्यामुळे नागरिकांतून समाधान व्यक्त केले जात आहे .

### जिल्हाध्यक्ष राजेंद्र...

निवासस्थानी प्रत्यक्ष भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमास पक्षाचे पदाधिकारी निष्ठावंत कार्यकर्ते, विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच शेकडो कार्यकर्त्यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. हितचिंतक, कार्यकर्ते, मित्रपरिवार, विवीध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली.जिजाऊ मल्टीस्टेट संघर्ष कृती समितीचे शेख कुतुब भाई, इंजि.सखाराम कळासे,भाऊसाहेब परसे,लक्ष्मण हाटवटे, प्रा राजाराम माने सूर्यभान नवले, अच्युतराव वाघ, प्रवीण पोकळे,अशोक कदम, संजय आगलावे, अच्युतराव सावंत..धनंजय गुंदेकर, चंदू शेळके, बबनराव क्षीरसागर, सरपंच शिंदे,राष्ट्रवादी युवा नेते भागवत आबुज,किरण डोळस, अशोक खोसे सर,विकास पवार, विनय पवार, सचिन मस्के, आकाश शेळके, अभिषेक सूर्यवंशी, महेश सुपेकर, योगेश सुपेकर, सदाशिव पवार, विलास शिंदे, प्रवीण इंगळे, भगवान परजणे, दिलीप मस्के, बंडू मस्के, रामभाऊ काळे, भागवत मस्के, बंडू लांडे, हनुमान मस्के, नितीन आमटे, सचिन आगाम, गणेश शेंडगे, गंगाराम घुमरे, राजाभाऊ घुमरे, राहुल मुळे, , शेषराव तांबे, अभय बिडकर, सरपंच रामा बांड, राहुल साबळे, शेलारमामा, भगवानराव गवते, प्रशांत मोटे,शहादेव लोंढे, महेश सावंत, जलील पठाण, दीपक उजगरे, तलाठी तांदळे, बालासाहेब इंगोले, गणेश साबळे, विलास तांदळे, लालासाहेब पन्हाळे, बद्रीनाथ जटाळ, संदिपान प्रभाळे, प्रल्हाद चित्रे, अनुरथ मस्के, जाधव सर, हरिदास तकिक, सरपंच रामेश्वर आनेराव, विकास कुटे,बिबीशन जाधव, राहुल शिनगारे, छत्रभुज फाळके, चौरे देवदत्त, अक्षय माने, प्रवीण कोलंगडे, नाना शिंदे, राजेश गवळी, बाळासाहेब गात, सरपंच वैजनाथ नेवाळे, डॉ महादेव बागलाने, बंडू वाजे, शरद दुग्गड, नाना कागदे, राम चव्हाचेअरमन शिंदे, गणेश तोडेकर, बाळासाहेब वायभट,उद्धव जाधव, युवराज मस्के,सुरेश माने, सरपंच संदीप नवले, राहुल गायकवाड, अजय ढाकणे, तुकाराम कागदे, दीपक काळकुटे, किशोर शेळके, पत्रकार वडमारे, सोमनाथ....,कदम केशव, लक्ष्मण भिंगले, गणेश वाणी, सरपंच गोरख शिंदे पंडित तुपे, महेश तिवारी सरपंच महादेव नेहराळे,अमर सारडा,प्रदीप शिंदे, अविनाश बडगे, महेश दहे, शेषराव बहिरवाळ बाबुराव कदम, विकास वायकर, शरद बहिरवाळ,राधाकिसन मेहेत्रे, सूर्यकांत जगताप, मनोज गोरे, सरपंच भागवत ठाकरे, पत्रकार राहुल पवार,दिलीप पवार, सतीश शेळके, अशोक चौरे, , विठ्ठल ढोकणे, ज्ञानेश्वर शिंदे, सरपंच जोगदंड, शेख रहीम भाई,पप्पू माने, आबा शेळके, सलीम इनामदार, नगरसेवक जलील खान पठाण,पत्रकार शेख, शिवशंकर गाडे, भास्कर चव्हाण, भारत खोड, मच्छिंद्र तकिक, सरपंच बिब्बन भाई, बाबुराव गवते, अनिल शेळके, भागवत आगाम, जीवनराव देशमुख, विठ्ठलराव वाघ, मुकेश पवार, रावसाहेब तात्या मस्के, चेअरमन कल्याण पवार, सचिन गाडे, गोकुळ जाधव, सोमनाथजाधव, विलास जाधव, समीर पठाण, बापू घोडके, विलास घोडके, अजय धांडे, मयकल सर, प्रशांत शेळके, भाऊसाहेब गोरे, सलाम पठाण, वाहेद भाई,सुभाष बहिरवाळ,गजानन बहिरवाळ,अंकुश खटाने, योगेश बहीरवाळ,शेख जमीर शेख खाजा, सचिन जाधव, विशाल पाखरे, विक्रम गोरे,केशव शेळके, अशोक फाळके, आकाश शेळके, गजानन जवकर,महेश भिसे, ऋषिकेश सुरवसे, पवन हाडे, शफिक काजी, घोलप मामा,स्वप्निल मस्के,आप्पासाहेब झोडगे, ज्ञानेश्वर आंधळे ,रमकिसन रहाडे,वैभव घुमरे, चंद्रसेन शेळके, पांडुरंग गवते, या कार्यक्रमास पक्षाचे पदाधिकारी निष्ठावंत कार्यकर्ते, विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच शेकडो कार्यकर्त्यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. हितचिंतक, कार्यकर्ते, मित्रपरिवार, विवीध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली.

### राजमाता जिजाऊ...

असलेले प्रा. टी. एन. ढवळे नियत वयोमानानुसार ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांनी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळामध्ये ३२ वर्ष मराठी विषयाचे अध्यापन केले. यानिमित्त महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते शाल व पुष्पहार देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी प्रा. टी. एन. ढवळे यांना शुभेच्छा देताना पुढील जीवन आरोग्यदायी लाभावे याकरिता शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांच्या वतीने त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. वायाळ सर तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार डॉ. अशोक लाखे यांनी केले.


## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. के सी बागल मॅडम, ६ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : ७६८/२०२५**
**त्रिंबक -वि. - निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **रंगुबाई भ्र. दामु उर्फ दामोदर वाळके रा. खंडाळा ता.जि.बीड हे दि. ०८.०४.२०२५ रोजी मौजे खंडाळा ता.जि.बीड** येथे मयत झाले आहेत.

अर्जदार- १) त्रिंबक पि. दामु उर्फ दामोदर वाळके यय-७९ वर्षे, धंदा-शेती, रा.खंडाळा ता.जि.बीड, २) गहिनीनाथ पि. दामू उर्फ दामोदर लोखंडे (वाळके), यय-५८ वर्षे, धंदा-शेती, रा.खंडाळा ता.जि.बीड, ह.मु.साईकृष्णलिला नगर,अहिल्यानगर (अहमदनगर), ता.जि. अहिल्यानगर (अहमदनगर), ३) पमाबाई अ.माणिक आहेरकर, वय-४९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. मुळूकचाडी ता.जि.बीड, ४) मीरा ४.उत्तम वाळके, वय-५६ वर्षे, धंदा घरकाम, रा.खंडाळा ता.जि.बीड, ह.मु. नरेश नगर, कामतघर, भिवंडी. ठाणे, ५) नागेश पि.उत्तम वाळके, वय-३० वर्षे, धंदा-खाजगी नौकरी, रा.खंडाळा ता.जि.बीड, ह.मु.दिनेश पाटील चाळ, ताडाळी रोड, धामणकर नाका,ब्रम्हानंद नगर, भिवंडी,ठाणे, ६) साईनाथ पि.उत्तम वाळके, वय-२८ वर्षे, धंदा-खाजगी नौकरी,रा.सदर, ७) कल्पना भ्र. अशोक जाधव, वय-३५ वर्षे, धंदा-घरकाम, रा.शामशाबाद, ता.जि.रंगारेड्डी (तेलंगणा)

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे **रंगुबाई भ्र. दामु उर्फ दामोदर वाळके रा. खंडाळा ता.जि.बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज ०५/०४/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १०/०७/२०२५
**(मार्फत- ॲड. जी.एम. केकान बीड)**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क. लिपीक — अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस.एस.पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. ८३७/२०२५**
**मीराबाई भ्र. रामभाऊ पवार वि. निरंक**

अर्जदार- १. मीराबाई भ्र.रामभाऊ पवार, वय-७२वर्षे, धंदा-घरकाम, रा. भवानवाडी ता. जि. बीड, २. नवनाथ पि.रामभाऊ पवार, वय-३९वर्षे, धंदा-शेती, रा. सदर ३. वैजीनाथ पि.रामभाऊ पवार, वय-३६वर्षे, धंदा-शेती रा.सदर ४. ताराबाई भ्र.नारायण जाधव, वय-५० वर्षे, धंदा-घरकाम, रा. लोनवळ ता. वडवणी जि.बीड, ५. विमल भ्र. एकनाथ पवार, वय-४२वर्षे, धंदा-घरकाम, रा.भवानवाडी ता.जि. बीड, ६. विलास पि. एकनाथ पवार, वय-२४वर्षे, धंदा-शेती, रा.सदर, ७. राहुल पि. एकनाथ पवार, वय- १९ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर, ८. पुजा पि. एकनाथ पवार, वय-१७वर्षे, धंदा-शिक्षण, अज्ञान अ.पा.क.आई अर्जदार क. ५ रा. सदर

गैरअर्जदार - निरंक

**प्रकरण- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत रामभाऊ पि.आनंदराव पवार यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत रामभाऊ पि.आनंदराव पवार हे दिनांक १६/१०/२०२१ रोजी स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहित मुलगी आहे. अर्जदार क्र.५ ही मयताच्या मयत मुलाची पत्नी म्हणजेच मयताची सुन असुन अर्जदार क्र. ६ व ७ हे नातु आहेत तसेच अर्जदार क. ८ ही अज्ञान असून तिची अ.पा.क. आई अर्जदार क. ५ ही आहे. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे रामभाऊ पि.आनंदराव पवार रा. भवानवाडी ता.जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील तारीख २९/०७/२०२५.**

आज दिनांक २६/०५/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
**(मार्फत- ॲड. डी. एम. रोटे)**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क. लिपीक — अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. कृतिका एस.खांडरे ३ रे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ७६५/२०२५**
**लताबाई सुरेश जगताप वि. निरंक**

ज्यापेक्षा **सुरेश पि. रामा जगताप, हे दिनांक** ०७.०२.२०२५ **रोजी रा. पिंगळे गल्ली, बीड ता. जि. बीड.** येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार-

१. लताबाई भ्र. सुरेश जगताप, वय-५३ वर्षे, रा. पिंगळे गल्ली,बीड ता.जि.बीड.

२. राहुल पि. सुरेश जगताप, वय-३५ वर्षे, रा. पिंगळे गल्ली, बीड ता.जि.बीड.

अर्जदार नं. १ ही मयत नामे **सुरेश पि. रामा जगताप,** यांची पत्नी असुन अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे. मयताचे आई वडील हे ब-याच वर्षापुर्वी मयत झाले आहेत. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास,त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत सुरेश पि. रामा जगताप, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. **प्रकरणाची पुढील तारीख १८/०७/२०२५ आहे.**

आज दिनांक १७ जुन २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.
**(ॲड. डी.एम. रोटे यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क. लिपीक — अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. सी. जोशी ७ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ७७६/२०२५**
**अप्पासाहेब राघू जानवळे वि. निरंक**

ज्यापेक्षा फुलाबाई **राघु जानवळे ह्या दिनांक २७.०१.२०२५ रोजी शिवाजी नगर, ता. बीड, जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार-

१. अप्पासाहेब पि राघू जानवळे, वय - ४१ वर्षे, धंदाशेती, रा. शिवाजी नगर, बीड, ता.जि.बीड, २. अशोक पि. राघू जानवळे, वय- ३८ वर्षे, धंदाशेती, रा. शिवाजी नगर, बीड, ता.जि. बीड.

अर्जदार क १ व २ हे मयत नामे फुलाबाई राघु जानवळे, यांची मुले आहेत. मयताचे पती नामे राघु दगडु जानवळे यांचा दि.२४.०९.२०१० रोजी मृत्यु झालेला आहे. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहू मयत फुलाबाई राघु जानवळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख /०५/०८/२०२५ आहे.**

आज दिनांक २७ मे २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.
**(ॲड. शिंदे जी. पी. यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क. लिपीक — अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड


Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक
● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
गुरूवार, दि.०३ जुलै २०२५ पान ४

## भाऊ-बाबा प्रतिष्ठान येथे आषाढी एकादशी निमित्त अंगद.म.मोरे यांचे किर्तन



**बीड । प्रतिनिधी**

श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड बालेपीर बीड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दि६/७/२०२५रविवार रोजी रात्री ८.३०वा देवशयनी आषाढी एकादशी निमित्त ह भ प अगंद महाराज मोरे यांचे हरि किर्तन आयोजित करण्यात आले आहे.तरी या किर्तन श्रवणाचा लाभो परिसरातील सर्व भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे अध्यक्ष डॉ राजेंद्र सानप व प्रतिष्ठानचे सर्व सहकारी यांनी केले आहे.



*बीड: श्री.विशाल डोईफोडे यांनी संघर्षातून मेहनतीने शिक्षण घेऊन मोरया ऑप्टिकल नावाने हे दुकान सुरू केलं व ग्राहकांचा मोठ्याप्रमाणा मधे भरभरून प्रतिसाद मिळत आहे. या वेळी भेट देऊन शुभेच्छा देताना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे छायाचित्रात आहेत.*

# दिव्यांग, ज्येष्ठांना खा.बजरंग सोनवणेंमुळे मिळणार 'आधार'

### जिल्ह्यात १८ जुलैपासून कृत्रिम साहित्याचे वाटप, पंचायत समिती स्तरावर शिबीरांचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

दिव्यांग बांधवांना सहानुभूती नव्हे, तर भक्कम साथ देऊया!, या उदात्त दृष्टीकोनातून खा.बजरंग सोनवणे यांच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासन व एलिम्को मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने संपुर्ण बीड लोकसभा मतदार संघाम ध्ये दिव्यांग व्यक्तींना व ज्येष्ठ नागरिकांना म ोफत कृत्रिम साहित्य/साधने वाटप करण्यात येणार आहे. दि.१८ जुलैपासून हे शिबीर पंचायत समिती स्तरावर राबविण्यात येत आहे.



बीड लोकसभा मतदारसंघातील तालुक्यांमध्ये भव्य पूर्व तपासणी व नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. या शिबिरांचा मुख्य उद्देश दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव, विविध सहाय्यभूत साधने उपलब्ध करून देणे, तसेच ज्येष्ठ नागरिकांना 'राष्ट्रीय वयोश्री योजने' अंतर्गत मोफत सहाय्यक उपकरणे प्रदान करणे हा आहे. एलिम्को, मुंबई या केंद्र शासनाच्या अधिकृत संस्थेच्या माध्यमातून, १८ जुलै ते ३० जुलै २०२५ या कालावधीत बीड लोकसभा मतदार संघात ही विशेष शिबिरे आयोजित केली जातील. या शिबिरांमध्ये पात्र लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी, ▶▶ उर्वरित पान २ वर

**● बीड लोकसभा मतदारसंघातील जास्तीत जास्त दिव्यांग बांधवांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिरांमध्ये सहभागी होऊन या योजनेचा लाभ घ्यावा. जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांपर्यंत गावचे प्रमूख म्हणून सरपंच आणि गावातील तरूणांनी ही माहिती द्यावी, जेणे करून त्यांना या शिबीराचा लाभ होईल. – खा.बजरंग सोनवणे, बीड लोकसभा मतदारसंघ**

### शिबीर कधी व कोठे ?

| तालुका | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|
| केज | १८ जुलै | पंचायत समिती |
| अंबाजोगाई | १९ जुलै | पंचायत समिती |
| बीड | २१ जुलै | पंचायत समिती |
| माजलगाव | २२ जुलै | पंचायत समिती |
| पाटोदा | २३ जुलै | पंचायत समिती |
| वडवणी | २४ जुलै | पंचायत समिती |
| आष्टी | २५ जुलै | पंचायत समिती |
| धारूर | २६ जुलै | पंचायत समिती |
| परळी | २८ जुलै | पंचायत समिती |
| शिरूर | २९ जुलै | पंचायत समिती |
| गेवराई | 30जुलै | पंचायत समिती |

# 'तलवाडा ग्रामपंचायत'चा भोंगळ कारभार

### सरकारी जागेवर भोगवटा दाराचे पीटीआरला मालकीत नाव ?

**तत्कालीन ग्रामसेवक आणि कर्मचाऱ्याचा प्रताप ; वरिष्ट अधिकाऱ्याची डोळेझाक भूमिका ; तपासणीत अनेक प्रकरणे उघडे पडतील**

**बीड । प्रतिनिधी**

मागील चार ते साडेचार वर्षापासून तलवाडा ग्रामपंचायत च्या अनागोंदी कारभारामुळे तालुक्यात चर्चेत आसलेली तलवाडा ग्रामपंचायत ही आजही वादाच्या भवऱ्यात असून गाव तलावाच्या संरक्षण भिंती लगट अतिक्रमणाच्या मुद्द्याने पुन्हा




एकदा चर्चेचा विषयी बनली आहे . यातच अतिक्रमित सरकारी जागेवर पिटीआर नक्कल मध्ये मालकीच्या रकान्यात नाव देऊन सरकारी जागा आर्थिक देवान घेऊन नावावर लावून दिल्या असल्याचे समोर येत आहे या मध्ये तत्कालीन ग्रामसेवक आणि कर्मचारी यांनी मोठा आर्थिक मलिदा लाटला असल्याची चर्चा असून वरिष्ठ अधिकारी गप्प का होते असा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे या आर्थिक तडजोडीत पंचायत स्तरावरील अधिकारी ही सामील आहेत का ? त्यांनी ग्रामपंचायत च्या अनागोंदी कारभाराकडे कानाडोळा का केला ? असे एक ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर व उपचार करण्यासाठी बीड जिल्हा न्यायालय या ठिकाणी ठेवण्यात आले. यावेळी शेकडो वकिलांच्या आरोग्याची तपासणी करून त्यांना उपचार देण्यात आले या प्रसंगी दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, ॲड. गणेश घुगे, ॲड. राजाभाऊ चोले, प्रथमेश नारकर, कैसीक सुर्वे, तृप्ती असक्ट, दिपाली परभ, हर्षल भालेराव, सुनील महाजन आदी छायाचित्रात दिसत आहेत.*

# जिजाऊ मल्टीस्टेट ठेव घोटाळ्याचा आज दुसरा वर्धापन दिन

### संचालकांच्या मालमत्ता जप्ती कारवाईत पोलीसांचा हलगर्जीपणा: अशोक हिंगे

**बीड । प्रतिनिधी**

जिजाऊ मल्टीस्टेट २०० कोटी ठेव घोटाळा प्रकरणी तब्बल पाच गुन्हे नोंद होवुन ३ जुलै रोजी २ वर्ष पुर्ण झाली. अद्याप संचालकांच्या मालमत्ता जप्त करण्याचे धाडस आर्थिक गुन्हे शाखने केले नाही. जाणीव पूर्वक संचालकांना न्यायालयात कारवाईसाठी वेळ देवुन मालमत्ता वाचवण्यासाठी पोलीसां कडून मदत होत असल्याचा संशय ठेवीदारांत पसरला आहे. खाडे, गोल्डे गेले. परंतु संचालकांच्या मालमत्ता जप्ती कारवाईत पोलीसा कडून जाणीवपूर्वक हलगर्जीपणा केला जातोय. मंजूर एमपीआयडी

**●पोलीस अधीक्षकांनी जिल्ह्यातील प्रत्येक अन्यायग्रस्त नागरीकांना न्याय आणि गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्या साठी समाधान ४८ नवीन रणनीती हाती घेतली. हा निर्णय कौतुकास्पद आहे.परंतु हा निर्णय आर्थिक गुन्हे शाखेला कर्तव्यदक्ष एसीपींची समाधान रणनीती रूचत नसावी, म्हणून दिरंगाईने कारवाई चालू आहे काय. असावी.सुचना देवुन ही कारवाई केली नाही. एसपी साहेबांनी गंभीर दखल घ्यावी. ठेवीदारांना सुध्दा समाधान रणनीतीचा लाभ द्यावा. हि विनंती–अडकलेला ठेवीदार, मारुती तिपाले बीड**

प्रस्ताव अपुर्ण असल्याने मृगजळ ठरु नये. ठेवीदारांना चिंता भेडसावत आहे. ठेवीदारांच्या सततच्या पाठपुराव्याने एम पीआयडी प्रस्ताव मंजूर होऊन मालमत्ता जप्तीच्या कारवाई सुरू झाली. हा मोठा दिलासा शासनाने दिला. या कामी काही पोलीस कर्मचाऱ्यांनी कर्तव्य तत्परता बजावली. त्यांचे मन:पूर्वक आभार. एसपी साहेबांची सुचना व ठेवीदारांनी अनेकदा मागणी करून ही पोलीस दुर्लक्ष करीत असतील तर संचालकाच्या मालमत्ता जप्तीसाठी ठेवीदार बांधवांना ▶▶ उर्वरित पान २ वर

## धोंडराईच्या लोकनियुक्त सरपंच शितल साखरे यांच्या विरुद्ध अविश्वास प्रस्ताव सादर



**उमापुर । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील मौजे धोंडराई ग्रामपंचायत साठी घेण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणूक डिसेंबर २०२२ मध्ये शितल अशोक साखरे ह्या ना.मा.प्र स्त्री प्रवर्गातुन सरपंच म्हणून निवडून आलेल्या असुन त्या सद्ध्या काम पाहत आहेत.ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच शितल साखरे यांच्या विरुद्ध अविश्वास प्रस्ताव मंगळवार (१) रोजी दाखल करण्यात आला आहे. सरपंच मनमानी कारभार करत असुन १४ / १५ वित्त आयोगाच्या निधि मध्ये भ्रष्टाचार, सदस्यांना विश्वासात न घेणे, ग्रामपंचायतीची वार्षिक व मासीक सभा न बोलावणे या व आदी कारणांमुळे धोंडराई गावच्या सरपंचाविरुद्ध सदस्यांनी तहसीलदार यांच्या कडे अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे.याविषयी विशेष सभा दि ७ सोमवार रोजी सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालय धोंडराई येथे आयोजित करण्यात आली आहे.

## निराधार व वृद्ध महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी बीडचे तहसीलदार शेळके व्हिडिओ कॉलवर

**बीड । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांसाठी शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा म्हणजे शेतरस्ता असतो . परंतु काही अडचणींमुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतातील रस्ता नसल्यामुळे शेतीमाल तसेच दैनंदिन कामकाजासाठी अडचणी निर्माण होऊन भांडणे होतात , असा सार्वत्रिक अनुभव आहे .

महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत . शेतकऱ्यांचे रस्ते मोकळे करण्यात यावे , त्यासाठी महाराजस्व अभियान राबवावे , मोकळे करून दिलेल्या रस्त्याच्या नोंदी सातबारावर घ्याव्यात , जिवंत सातबारा म्हणजेच सातबारा वरील मयतांची नावे कमी करून वारसांची नावे लावून घ्यावी ,



याशिवाय सातबारावर असलेल्या अनावश्यक नोंदी कमी करण्यात याव्यात अशा एक ना अनेक गोष्टी महसूल मंत्र्यांनी करून घेण्याचा चंग बांधलेला आहे .

नागरिकांना वाळू ऐवजी कृत्रिम वाळू कशी उपलब्ध होईल यासाठी सुद्धा त्यांचा मोठ्या प्रमाणात पाठपुरावा सुरू आहे . छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर हे सस्ती अदालत योजनेतून शेतकऱ्यांना कमी खर्चातून कसा रस्ता मिळेल यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत . त्यासाठी त्यांनी जिल्हाधिकारी यांच्या बैठका घेऊन विविध प्रकारच्या सूचना केल्याची दिसून येते . बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी जिल्हाभरात शेतकऱ्यांप्रती तसेच वृद्ध , दिव्यांग यांच्याप्रती असलेल्या मदत भावनेतून अनेक नवीन उपक्रम सुरू केले . जिल्हाधिकारी स्वतः तालुकास्तरीय बैठका घेऊन महाराजस्व अभियान , छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर योजना , फार्मर आयडी काढणे , जिवंत ▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन कार्यक्रम उत्साहात संपन्न

### महाराष्ट्राची धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायण गड येथे संत कुलभूषण नगदनारायण महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेतले

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष मा. राजेंद्रजी मस्के यांच्या वाढदिवसा निमित्त अभिष्टचिंतन कार्यक्रम राशी निवासस्थानी उत्साहात पार पडला. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील, ज्येष्ठ नेत्या खा.सुप्रियाताई सुळे, बीडचे खा. बजरंग बप्पा सोनवणे, आ.संदीप क्षीरसागर यांनी भ्रमणध्वनी द्वारे शुभेच्छा दिल्या.

ज्येष्ठ नेते मा.आ.राजेंद्र जगताप साहेब, मा.आ. जनार्धन तात्या तुपे, सामाजिक नेते



अशोकराव हिंगे, नगरसेवक रमेश चव्हाण, शिवसेनेचे सुनील सुरवसे, माजी सभापती सोमनाथ राव माने,दुष्यंत डोंगरे, सुहास उगले, ड.अशोक वाघमारे, माजी पं.स. गुंडीबा नवले,.राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम, जलील खान साहेब,नसिम इनामदार साहेब,शेख अकील भाई,शेख अय्युब भाई, पठाण अय्युब खान,रहिम भाई, मोमीन सलम ान,वसीम भाई, पत्रकार सोमनाथ खताळ ,संजय मालानी,संदीप लवांडे ,वैष्णव ,अभिजीत नखाते ,केशव कदम,दत्ता नरनाळे शिवसंग्राम चे अनिल घुमरे,शिक्षक संघटनेचे श्रीराम बहिर, हेमाताई पिंपळे शेख राणीताई

सुरेखा ताई नवले स्नेहा खंडागळे,संजीवनी देशमुख राजेंद्र बहिर, बाळासाहेब गोरे राष्ट्रवादी वडवणी तालुका अध्यक्ष महादेव जमाले, परळी तालुका अध्यक्ष बाबासाहेब शिंदे,दीपक काळकुटे, भाऊसाहेब डावकर बळीराम गवते, हनुमान मुळीक प्रा सचिन उबाळे आज सकाळपासून हितचिंतक तसेच ग्रामीण व शहरी भागातील कार्यकर्त्यांनी राशीचे ▶▶ उर्वरित पान २ वर



*ना. काझी समीर यांची शिवसेना पक्षाच्या अल्पसंख्याक विभाग कार्याध्यक्ष( महाराष्ट्र राज्य) निवड झाली त्यानिमित्ताने त्यांचे स्वागत करताना युवा नेते शेख अजहर आदि.*

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्रा. टी. एन. ढवळे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील कनिष्ठ विभागामध्ये मराठी विषयासाठी कार्यरत ▶▶ उर्वरित पान २ वर

